**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक १६/०६/२०२५ (सोमवार)**

---

## खंडणीकरीता अपहरण करणाऱ्या अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन ५ आरोपीतांना केली अटक ,कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— फिर्यादी नामे परमेश्वर पिसाराम एकनाथ, रा. वार्ड क्र २ सेलु, ता कळमेश्वर, जि. नागपुर यांनी पो.स्टे. कळमेश्वर ला रिपोर्ट दिली की, दिनांक १०/०६/२०२४ रोजी सकाळी ०७:०० वा. दरम्यान फिर्यादी हे सेलु गावावरून कळमेश्वर येथे जिम मध्ये येत असतांना नागपुर काटोल बायपास वरून रेल्वे बोगदयाखालुन कळमेश्वर बाजार चौकाकडे येणाऱ्या मार्गावर ६ अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीला जबरदस्तीने त्यांचे चारचाकी वाहनात अपहरण करून पाचगाव येथील शेतशिवरात नेवुन फिर्यादीला मारहाण करून ३० लाखाची खंडणी मागितली आणि फिर्यादीला शस्त्राने जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम १४०(२),६१, ११८(१),३५१(२) भा.न्या.स. सहकलम ४/२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात केला होता.

**कळमेश्वर पोलीसांनी वरीष्ठांच्या मार्गदर्शनात सदर गुन्हयाचा तपास तात्काळ सुरू केला . गोपनीय बातमीदार आणि तांत्रिक पुराव्या वरून सखोल आणि योजनाबध्द पध्दतीने तपास करून कळमेश्वर पोलीसांनी दिनांक १६/०६/२०२५ रोजी आरोपी नामे १) समीर गजानन कांबळे, वय २६ वर्षे, २) संतोष रामु खाडे, वय २७ वर्ष, ३) अभिजीत पुरूषोत्तम बनकर, वय २५ वर्षे, ४) राजकुमार लक्ष्मण खाडे, वय २५ वर्ष, ५) मुकेश रोहीत डोंगरे, वय २७ वर्षे , सर्व रा. उद्री ता.उमरेड जि. नागपुर यांचा शोध घेवुन नमुद आरोपीतांना सदर गुन्हयात अटक केली आहे. नमुद गुन्हयाचा तपास कळमेश्वर पोलीस करत आहेत.**

## निष्काळजीपणामुळे मृत्युस कारणीभुत होणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक ११/०६/२०२५ रोजी मौजा फन एन्ड फुड व्हिलेज बाजारगाव येथे मृतक नामे नैतिक अमित देशमुख, वय ०७ वर्ष १० महीने रा.मनिष नगर नागपुर हा त्याचे कुटुंबासोबत पिकनिक ला गेला असता तो पाण्यात बुडुन मयत झाला. सदर प्रकरणी मृतकाचे वडील अमित प्रकाश देशमुख, वय ३७ वर्षे रा. मनिष नगर नागपुर यांच्या तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कोंढाळी येथे अकस्मात मृत्यु ची नोंद करण्यात आली होती.

कोढांळी पोलीसांनी सदर अकस्मात मृत्युची चौकशी केली असता मृतक नैतिक अमित देशमुख याचा मृत्यु फन ॲड फुड व्हिलेज बाजारगांव येथील मॅनेजर चंदनकुमार सिंग जमुना सिंग, वय ४१ वर्षे, रा. पाम व्हिलेज, वेस्ट दिल्ही ह.मु. फन ॲन्ड फुड व्हिलेज बाजारगांव यांचे निष्काळजीपणा व हलगर्जीपणा मुळे झाला असुन नमुद आरोपी मॅनेजर हे मृतकाचे मरणास कारणीभुत असल्याचे मर्ग चौकशी मध्ये निष्पन्न होत असल्याने आरोपी मॅनेजर नामे चंदनकुमार सिंग जमुना सिंग, वय ४१ वर्षे, रा. पाम व्हिलेज, वेस्ट नवी दिल्ली. ह.मु. फन ॲन्ड फुड व्हिलेज बाजारगांव, यांचे विरूध्द कलम १०६(१) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास कोंढाळी पोलीस करत आहेत.

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ८ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांची कामगिरी

दिनांक **१५/०६/२०२५ रोजी श्री अनिल म्हस्के, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीमध्ये शिरपुर भुयारी शिवारात** काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. अशी माहीती मिळताच श्री. अनिल म्हस्के, यांनी केळवद पोलीस स्टेशन आणि सावनेर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदारांचे पथक तयार करून त्यांना तात्काळ नमुद घटनास्थळी जावुन कारवाई करण्याबाबत आदेश दिले. नमुद पोलीस पथक घटनास्थळी पोहचले असता काही इसम ५२ तासपत्त्यांचा जुगार खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी सापळा रचुन कारवाई करून आरोपी नामे **१) मनोज दयाशंकर पांडे, वय ४२ वर्ष रा. धामना, ता. कळमेश्वर २) रेवाराम नानाजी बोदरे , वय ३२ वर्ष रा.धामना, ता. कळमेश्वर**

**आणि ३) अरमान संजय पौणीकर, वय २२ वर्ष ,रा.धामना, ता. कळमेश्वर यांना जागीच पकडले. काही आरोपी पोलीसांना पाहुन पळुन गेले. मिळुन आलेल्या आरोपीतांना पळुन गेलेल्या आरोपीतांचे नाव पत्ता विचारले असता आरोपी क्रं ४) बच्चु बावरी, ५) सौरभ वाकडे, ६) खेमराज टोंगे ७) रोशन लोडे आणि ८) चंदु सर्व रा. धामणा, ता. कळमेश्वर अशी माहीती प्राप्त झाली. मिळुन आलेल्या** आरोपीतांच्या ताब्यातुन **१) रोख रक्कम १४,५०० /— रूपये, २) तीन ॲड्रॉईड मोबाईल, ३) मोटर सायकल क्रं एम.एच. ३१ सी.जे ४८२९, ४) मोटर सायकल क्रं एम.एच. ४९ ए.ए. १४८७ आणि ५) इतर साहीत्य एकुण ७९,०५० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद ८ आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे १२(अ) म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक १५/०६/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, उमरेड ते गिरड रोडने एका ओमनी गाडीमध्ये अवैधरित्या देशी दारूची वाहतुक केली जात आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी तात्काळ उमरेड ते गिरड रोडने पट्रोलींग केली असता **ओमनी गाडी क्र एम.एच ४० बी. ई. २८०७** हे वाहन समोर जाताना दिसले. पोलीसांनी वाहनाचा पाठलाग करून नमुद संशयीत वाहनाला मौजा सिल्लेपार येथे थांबविले. नमुद वाहनामध्ये असलेल्या चालकाला त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याचे **नाव आनंद अमृतराव पाटील, वय ४९ वर्षे, रा. बेसुर ता. उरमेड** अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता नमुद वाहनामध्ये देशी दारूचे १५ बॉक्स मध्ये १८० मिलीच्या ७२० नग निप मिळुन आल्या. पोलीसांनी चालक आरोपीला दारू बाळगण्याचा व वाहतुकीचा परवान्याबाबत विचारणा केली असता आरोपीने परवाना नसल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ओमनी गाडी क्र एम. एच ४० बी. ई. २८०७ किंमती २,३०,०००/— रूपये. आणि देशी दारूच्या १८० मिलीच्या ७२० नग निप किंमती ५०,०४,०० /— रूपये **एकुण किंमती २,८०,४०० /— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

सदर प्रकरणी आनंद अमृतराव पाटील, वय ४९ वर्षे, रा. बेसुर ता. उरमेड यांच्या विरूध्द कलम ६५ (अ) (ई) म.दा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने